# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०५/०८/२०२२ (शुक्रवार)**

**(सकाळ)**

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. अरोली** :— अंतर्गत कोदामेंढी येथे दिनांक ०४/०८/२०२२ चे ०६.३० वा. दरम्यान अरोली पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन अरोली पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.—८६/एफ— ३५८६ क्रमांकाच्या बोलेरो पिकअप गाडीला थांबवुन तपासले असता सदर वाहनात आरोपी क्र.१. राकेश भाऊराउ बोंद्र वय २८ वर्ष, २. हरिभाऊ भंगेरु ठेंगे वय ६० वर्ष, दोन्ही रा. हरदोकी यांच्या ताब्यातुन ८(बैल, बाय, गोरे) जनावरे कि. ४५,०००/—रू. निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण किंमती ४,४५,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस उपनिरीक्षक श्री. संतोष महंत, पो.स्टे. अरोली यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे वरील आरोपीविरुध्द कलम ११ (१)(ड) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम ५(१)(२) महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. जाधव मो.क्र. ९८७०३२८९०४ हे करीत आहे.

### चोरी

**१) पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील होळी चौक ते शिवमंदीर रोडवरील जे.एस.फीटनेस च्या समोर येथे दिनांक ०४/०८/२०२२ चे ०४.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— रामनाथ पुरूषोत्तम उपाध्याय, वय ३७ वर्षे, रा.पतानी तहसील ढाका जिल्हा चंपारण मोतीहारी ह.मु जनता लॉन सावनेर यांना थकवा आल्याने रोडच्या कडेला असलेल्या सिमेन्ट कटयावर झोपले. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने पॅन्टाचे खिशातील रेडमी कंपनीचा काळया रंगाचा मोबाईल कि. ५,०००/—रूपये चा स्वताच्या आर्थीक फायद्याकरीता चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार विजय पांडे हे करीत आहे.

**२) पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील मखीजा कंपनी एमआयडीसी बोरी येथे दिनांक ०४/०८/२०२२ चे १६.०० वा. ते १६.३० वा. सुमारास मखीजा कंपनी एमआयडीसी कंपनीतील मशीन ॲल्यूमिनीअम प्लेट कि. ५,०००/–रू. ची आरोपी नामे– मंजूर समसूद्दीन खान, वय ४२ वर्ष, रा. कोची ता. लावालौग जि. चतरा (झारखंड) ह.मु. बुटीबोरी याने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मनोज जगदिश तलरेजा, वय ३० वर्ष, रा. वैषाली नगर, नागपूर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार प्रमोद बन्सोड मो.नं. ९६७३६०८६४२ हे करीत आहे.

## जबर दुखापत

**पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील पंचवटी काटोल येथे दिनांक ०३/०८/२०२२ चे ०९:०० वा. ते ०९:२० वा. सुमारास फिर्यादी नामे– लोकेश रविशंकर तेलंते वय २७ वर्ष, रा. पंचवटी काटोल याने आरोपी नामे– जयंत प्रल्हाद तेलंते, रा. पंचवटी काटोल याला गाडी फायनान्स उतरविण्याचे काम दिले होते. त्याकामासाठी १००० रूपये दिले होते. त्यापैशातुन ५०० रूपये शिल्लक होते. याकारणावरून आरोपीने शिवीगाळ करून फिर्यादीला फायटरने मारहाण केली त्यामुळे फिर्यादीचे हाताचे मनगटावर जखमी केलेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक सुनिल ठोंबरे मो.नं. ९०११०२६४१४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**